दयानंद कलाच्या स्टाफद्वारे प्र.प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचा सत्कार

लातूर- नवनियुक्त प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद कला महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जवळगेकर तर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिलकुमार माळी व पर्यवेक्षक प्रा.डॉ. दिलीप नागरगोजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना प्र.प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी आपले अनुभव व भविष्याविषयी निर्धारित केलेल्या काही रचनांचा उल्लेख केला. तसेच काम करीत असताना व्यक्तीने त्याचा पदाचा विचार न करता काम करणाऱ्याच्या क्षमतेचा विचार करने हे गरजेचे असते असे ही त्यांनी सांगितले. प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना आव्हान केले की जर काही नवे विचार, नव्या संकल्पना प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टिकोनातून आवश्यक वाटत असतील तर मनात संभ्रम न बाळगता त्या प्रशासनाच्या निदर्शनास अणून द्यावेत.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्रा.डॉ. शिवाजी जवळगेकर यांनी डॉ. गायकवाड यांच्या वैयक्तीक स्वभावाची माहिती देताना त्यांच्या प्रांजळपणा व निस्वार्थ सेवेच्या भावनेविषयी माहिती सांगितली. तसेच डॉ. गायकडवाड यांना भविष्याकरीता शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आभार प्रा. महेश जंगापल्ले यांनी मांडले तर सूत्रसंचालन पर्यवेक्षक तथा स्टाफ प्रमुख प्रा.डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व अनुदानित-विनाअनुदानित प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.